# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धी पत्रक

- **राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत मनपाच्या संघाचे चमकदार यश**
- **मा.आयुक्तांकडून विजयी कबड्डी संघाचे विशेष कौतुक**

नेताजी सार्वजनिक वाचनालय, पढेगाव येथे दिनांक 3 ते 9 सप्टेंबर 2025 दरम्यान पार पडलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत मिरा भाईंदर महानगरपालिका कबड्डी संघाने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल मनपा मा.आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी संपूर्ण संघाचे विशेष अभिनंदन करत त्यांचे मनःपूर्वक कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी दाखवलेली चिकाटी, आणि कौशल्यपूर्ण खेळ यामुळे महानगरपालिका कबड्डी संघाने आपले वेगळेपण सिद्ध केले. यशाच्या या टप्प्यावर मनपा आयुक्तांनी कबड्डी संघाची विशेष भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला आणि त्यांचे मनोबल वाढवले.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागाने एकूण 15 कबड्डीपटूंना अधिकृतपणे दत्तक घेतले आहे. या खेळाडूंना व्यावसायिक पातळीवर प्रशिक्षण मिळावे यासाठी या संघाला अनुभवी प्रशिक्षक,तज्ज्ञ फिटनेस ट्रेनर, प्रोफेशनल फिजिओथेरपिस्ट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कबड्डी संघामुळे क्रीडा क्षेत्रात गुणवत्ता वाढवण्याचा मनपाचा प्रयत्न यशस्वी ठरत आहे.

मा. आयुक्तांकडून मिळालेल्या प्रोत्साहन व शुभेच्छांमुळे संघातील खेळाडूंना नवचैतन्य मिळाले आहे, अशी भावना कबड्डी संघाने व्यक्त केली. पुढील स्पर्धांमध्ये आणखी चांगली कामगिरी करून महानगरपालिकेचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला. मिरा भाईंदर महानगरपालिका खेळ व क्रीडा क्षेत्रातील गुणवत्ता वृद्धीसाठी सदैव कटिबद्ध आहे. खेळाडूंना व्यासपीठ, संसाधनं आणि योग्य मार्गदर्शन देणे हाच मनपाचा खरा उद्देश आहे असे महानगरपालिका मा.आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा. प्र. से.) यांनी सांगितले आहे.